दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३१६ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२७ ऑगस्ट२०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आदिवासींचे ७० कोटी गेले कुठे?

## ‘लाडकी बहीण’ साठी आदिवासींचे बजेट वापरले गेले; प्रकाश आंबेडकरांचा महायुती सरकारवर आरोप

मुंबई (वृत्तसंस्था)–आगामी विधानसभा निवडणुकीत ’मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ महायुती सरकारला मोठी फायदेशीर ठरणार आहे, असा विश्वास महायुतीच्या नेत्यांना आहे. तर, राज्य सरकारकडे निधीच नसल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी आदिवासींच्या बजेवरुन राज्यसरकारला घेरलं आहे. ’लाडक्या बहीण’ योजनेसाठी आदिवासींचा निधी वर्ग केला का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.आदिवासींचे बजेट ७ टक्के आहे. म्हणजे ते ७० कोटी होते. लाडकी बहीण योजनेला कुठून पैसे आला? आदिवासींच्या बजेटचे ७ हजार कोटी लाडकी बहिण योजनेसाठी वर्ग केले का, असा सवाल आंबेडकर यांनी शिंदे फडणवीस सरकारला विचारला आहे.



### आदिवासींबद्दल जाणीव नाही

आदिवासींचे बजेट आदिवासींना खर्च करण्याचे बंधन आहे. आदिवासी बजेटमध्ये कशाकशावर खर्च केला याचे विवरणपत्र काढावे, असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी शिंदे सरकारला केले. १० हजार कोटी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ठेवले पाहिजे. दुर्दैवाने सरकारला अदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जाणीव नाही, असा आरोप देखील आंबेडकर यांनी केला. विधानसभेत बोगस आदिवासी भरती झाल्याचे सांगण्यात आले. जे बोगस होते त्यांना खुल्या प्रवर्गात समाविष्ट केले. पण पात्र आदिवासींची पेसा अंतर्गत भरती केली नाही. नाशिकच्या आदिवासी आयुक्तालयासमोर आंदोलन करण्यापेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यालय आंदोलनाचे केंद्र करा, असे आवाहन देखील प्रकाश आंबेडकर यांनी केला.पेसा अंतर्गत भरतीसाठी माजी आमदार जे. पी. गावित आक्रमक झाले आहेत. जे पी गावीत यांनी आमच्या सोबत तिसऱ्या आघाडीत यावे, अशी ऑफर प्रकाश आंबेडकर यांची गवितांना दिली आहे. माकपचे काँग्रेसशी लग्न झाले आहे. त्यांचा काडीमोड होण्याची वाट पाहू, असेही आंबेडकर म्हणाले.

### शिंदेंचे कार्यालय आंदोलनाचे केंद्र हवे

# भर पावसात विद्यार्थ्यांचा लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ मूक मोर्चा

**पुलगाव | प्रतिनिधी**

ऑल इंडिया ॲक्टिव्ह लिनेस क्लब आणि हिरकणी महिला मंडळाच्या वतीने पश्चिम बंगाल, बदलापूर, आणि अकोला येथील लैंगिक अत्याचाराच्या घटनांच्या निषेधार्थ शहरात मूक मोर्चा काढण्यात आला. २४ ऑगस्ट रोजी आयोजित या मोर्चाला महिलांनी आणि विद्यार्थ्यांनी खंबीर प्रतिसाद दिला.

मोर्चा ह.भू. आदर्श हायस्कूल येथून सुरू होऊन नगर परिषद पुलगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर मेणबत्त्या पेटवून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. आदर्श हायस्कूलच्या शिक्षिका आणि इतर शाळांतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर्समधून या मूक मोर्चाला आवाज मिळाला.




आर. के. हायस्कूलच्या शिक्षिका आणि क्लब माजी सचिव शुभांगी डाखोरे यांनी आपल्या भाषणातून लैंगिक अत्याचाराबाबत दुःख व्यक्त केले आणि मुलांना स्त्री सन्मानाचे संस्कार देण्याचे आवाहन केले. ह.भू. आदर्श हायस्कूलचे प्राचार्य संजय दुबे यांनी स्त्री अत्याचारा विषयी तीव्र रोष व्यक्त केला.

पुलगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार राहुल सोनवणे यांना मोर्चात सहभागी विविध संघटनांच्या प्रमुखांनी निवेदन दिले. मोर्चाचा समारोप सर्व विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप करून करण्यात आला. या मोर्चात शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

# राशन दुकानातून कुजलेले व खराब धान्याचे वाटप

### ग्रामपंचायत सदस्याची कार्यवाहीची मागणी

**मूल | प्रतिनिधी**

मूल तालुक्यातील नवेगाव भुजला गट ग्रामपंचायत अंतर्गत कोरंबी गावातील रास्त धान्य दुकानात नागरिकांना कुजलेले व खराब गहू आणि तांदूळ वाटप करण्यात आल्याचे गंभीर प्रकार उघडकीस आले आहे. या धान्याचे वितरण दुकानदाराने नागरिकांना केले, जरी ते खाण्यायोग्य नसले तरीही पुरग्रस्त असलेल्या या गावातील नागरिकांना हे धान्य देण्यात आले आहे.



सदर धान्य, जे आगस्ट महिन्यासाठी उपलब्ध करून दिले गेले होते, खाण्याच्या स्थितीत नव्हते आणि त्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. धान्य दुकानातील व्यवस्थापक महिन्यातून केवळ एकदाच धान्य वाटप करतात आणि त्या दिवशी धान्य नेले तर नेले, नाहीतर नका नेऊ अशा धमक्याही नागरिकांना देत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नवेगाव भुजला ग्रामपंचायतीचे सदस्य रजनीकांत किनेकर यांनी यासंबंधी तहसीलदारांना निवेदन देत, या प्रकरणाची सखोल चौकशी करून तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या सोबत पोलीस पाटील संदीप पोरटे, संतोष गेडाम, ओमदेव चांदेकर, अभिजीत नाहगमकर, दुर्गेश पोटे आदी नागरिक उपस्थित होते.ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांनी दिलेल्या या निवेदनामुळे प्रशासनाच्या कारवाईची अपेक्षा गावकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे, कारण ही समस्या नागरिकांच्या आरोग्यासाठी गंभीर ठरू शकते.

### सिंदीला तालुक्याचा दर्जा मिळण्यासाठी राष्ट्रवादीचे भव्य आंदोलन

# स्वतः उभारले होते तहसीलदार, नायब तहसीलदार,मुख्याधिकारी यांचे कार्यालय

### भर पावसात बसस्थानकावर तीन तास केले ठिय्या आंदोलन

### चार मुख्य मागण्यांपैकी एक मागणी पूर्ण

**सिंदी (रेल्वे) | प्रतिनिधी**

शहराला तालुक्याचा दर्जा तसेच नगर पालिकेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी, तहसील कार्यालयात सातही दिवस नायब तहसीलदार व सिंदी शहरात १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय या मागण्यांसाठी आज शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वाखाली सिंदी (रेल्वे) तालुका संघर्ष समितीद्वारा महाविकास आघाडीचा भव्य मोर्चा काढण्यात आला होता. यादरम्यान मोर्चेकरांकडून बसस्थानकावर तीन तास चक्का जाम करून भर पावसात ठिय्या आंदोलन करण्यात आले. प्रसंगी चार मागण्यांपैकी एक मागणी पूर्ण करण्यात आली तर तीन मागण्यांसाठी मंत्रालयाकडे पत्रव्यवहार करून लवकरच या तीन मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन तहसीलदार यांनी दिले.




सिंदी शहराला स्वातंत्र्यपूर्व काळापासून नगरपरिषद आहे. येथून २ कि.मी. अंतरावर नागपूर जिल्हा सुरू होतो. या शहराच्या आजू-बाजूला ३५ ते ४० खेडे आहेत. त्यामुळे तेथील नागरिकांना सिंदी येथे जाणे सहज सोयीचे आहे. परंतु, येथे नायब तहसील कार्यालयात नायब तहसिलदार राहत नसल्याने नागरिकांना सतत सेलू तहसील कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतात, उत्पन्नाचा दाखला, फेडेव्हिट अधिवास प्रमाणपत्र, खरेदी-विक्रीचे व्यवहार, रहिवासी प्रमाणपत्र, रेशन कार्ड, व इतर कोणतेही अडचण आल्यास सेलू येथे २३ किलोमीटर अंतर कापून तहसील कार्यालयात जावे लागते. याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागते.

या करीता सण २००४ व सण २०१५ मध्ये शासनाला निवेदन देऊन सिंदी शहराला तहसीलचा दर्जा मिळण्याकरीता मागणी करण्यात आली होती. मात्र, त्याचा उपयोग एवढाच झाला की सिंदी येथे मा. नायब तहसीलदाराला बेंच देऊन आठवड्यात १ दिवस सिंदीला दिले अर्थात नागरीकांचा १० टक्के त्रास वाचला परंतु ९० टक्के कायम आहे. यासंदर्भात दिनांक २७/०६/२०२४ मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना मा. नायब तहसीलदार यांचे मार्फत जन आनंदोलन करून निवेदन देण्यात आले. मात्र, त्याचाही काहीच उपयोग झाला नाही. परिणामी, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीद्वारा सिंदी (रेल्वे) तालुका संघर्ष समितीचा भव्य मोर्चा सोमवारी येथील नंदीचौकातून १२ वाजताच्या दरम्यान काढण्यात आला. सदर मोर्चा मुख्य मार्गाने मार्गक्रमण करून बसस्थानकावर पोहचला. यावेळी संतप्त मोर्चेकरांनी बसस्थानक चौकामध्ये चक्का जाम करून तीन तास भर पावसात ठिय्या आंदोलन केले. यावेळी आंदोलन कर्त्यांनी स्वयंघोषित तहसीलदार कार्यालय, नायब तहसीलदार कार्यालय, मुख्याधिकारी कार्यालय तयार करून उभारले होते. दरम्यान, नायब तहसीलदार मधुकर ठाकरे यांनी ठिय्या आंदोलनाला भेट देत वांदिले यांच्याशी चर्चा केली. परंतु, जोपर्यंत तीनही मुख्य मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आम्ही येथून हलणार नाही, शिवाय आम्हाला जेलमध्ये टाकून द्या अशी भूमिका अतुल वांदिले यांनी घेतली.ही माहिती तहसीलदार विकास ननवटे यांना मिळताच अवघ्या पाऊण तासात तहसीलदार ननवटे आंदोलनस्थळी पोहचून त्यांनीही अतुल वांदिले यांच्याशी १५ मिनिट चर्चा केली. चर्चे दरम्यान शेवटी सिंदी येथील तहसील कार्यालतात आठवड्यातून पाच दिवस नायब तहसीलदार उपस्थित राहण्याची ही एक मागणी पूर्ण करून नगर पालिकेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी, सिंदीला १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व सिंदी शहराला तालुक्याचा दर्जा या तीन मागण्यांबाबत लवकरच मंत्रालयाशी पाठपुरावा करून निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन यावेळी तहसीलदार ननवटे यांनी दिले. मोर्चे दरम्यान पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. या भव्य मोर्चामध्ये शरदचंद्र पवार राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, सिंदी शहर अध्यक्ष गंगाधर कलोडे, युवा अध्यक्ष तुषार हिंगणेकर, काँग्रेसचे शहर अध्यक्ष प्रकाशचंद्र डफ, उ.बा.ठा. चे शहर प्रमुख सचिन लांबट, मुन्ना शुक्ला सह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व परिसरातील ४० गावातील नागरिकउपस्थितहोते.

### शंकरपूरला यशवंतराव चव्हाण

# मुक्त वसाहत योजनेत समाविष्ट करण्याची मागणी

### उपसरपंच अशोक चौधरी यांचा आग्रह

**चिमूर | शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर हे गाव यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून वगळण्यात आले आहे, ज्यामुळे येथील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील नागरिकांवर अन्याय झाल्याचा आरोप उपसरपंच अशोक चौधरी यांनी केला आहे.

शंकरपूरमधील अनेक कुटुंबांना अद्याप आपले हक्काचे घर मिळालेले नाही. विमुक्त जाती व भटक्या जमातीतील हे कुटुंबे आपले जीवनमान सुधारण्यासाठी आणि स्थायिक होण्यासाठी या योजनेवर अवलंबून होती. २०२३-२४ या वर्षात राज्य सरकारने या समुदायांच्या उत्थानासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना लागू केली, ज्यात प्रत्येक गावात ग्रामसभेच्या ठरावानुसार लाभार्थ्यांची नावे निश्चित करण्यात आली. परंतु, चंद्रपूर जिल्ह्याच्या यादीत शंकरपूर गाव वगळण्यात आले आहे, ज्यामुळे येथे अनेक कुटुंबे लाभापासून वंचित राहिली आहेत.

उपसरपंच अशोक चौधरी यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी आग्रह धरला आहे की, शंकरपूर गावाला यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेत समाविष्ट करून येथील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील कुटुंबांना पक्के घर मिळावे.


# अजगराची यशस्वी सुटका: संजीवन पर्यावरण संस्थेच्या सदस्यांचे धाडस



मूल तालुक्यातील फीस्कुटी गावात महेश शेंडे यांच्या घराजवळील शेतात जाळीत अडकलेल्या अजगराची सुटका संजीवन पर्यावरण संस्थेच्या सदस्यांनी केली. ही माहिती मिळताच संस्थेचे उमेशसिंह झिरे, पंकज उजवने, रितेश पिजदुरकर, दिनेश खेवले, ओम पाल, आणि हौशीक मंगर यांनी घटनास्थळी पोहोचून अजगराला सुरक्षितपणे पकडले. गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने या घटनेला साक्षीदार होते. महिनाभरापूर्वी आलेल्या पुरामुळे नदीकिनारी राहणारे अजगर शेतांमध्ये येत असल्याचे निदर्शनास आले आहे.**(छायाचित्र: अजगराच्या सुटकेदरम्यान संजीवन पर्यावरण संस्थेचे सदस्य आणि उपस्थित गावकरी)**

# कोकणा जमातीची डिस्कवरी

## कोकणातील कोकणा आदिवासी: ऐतिहासिक आणि सामाजिक वेध हे पुस्तक




कोकणातील कोकणा आदिवासी: ऐतिहासिक आणि सामाजिक वेध हे पुस्तक प्रकाशित झाले आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील 'समाजशास्त्र विभागात' कार्यरत असलेले पद्माकर सहारे यांचे हे संशोधनात्मक पुस्तक आहे. समाजशास्त्र विभागात गेल्या २६ वर्षापासून ते अध्यापनाचे कार्य करत आहेत. 'सामाजिक संशोधन पद्धती' हा विषय त्यांच्या अभ्यासाचा, चिंतनाचा आणि अध्यापनाचा राहिला आहे. तसेच त्यांनी कोकणातील कोकणा जमातीचा अनेक वर्षापासून सखोल वेध घेत संशोधन केले आहे. त्यांचे हे पुस्तक म्हणजे आयुष्यातील अनुभव, चिंतन, वस्तुनिष्ठ निरीक्षण आणि संशोधनाचे सार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील सौरव प्रकाशनातर्फे ३७८ पानांचे हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

आदिवासी कोकणा, कोकणी, कुकणा समुदाय दक्षिण कोकणात प्रथमतः गोवा, कारवार (कर्नाटक), रत्नागिरी सीमा प्रदेशात हजारो वर्ष राहिला. इ. स. ५ व्या शतकात कोंकवन, कोंकदेश वा कोंगनाड या देशावर कदंब वंशातील भगीरथ राजा ज्याचे वर्णन कदंब भूमीचा स्वामी म्हणून महान राजा सागर (इ.स. ३९५-४२१, कर्नाटक) यांनी हा प्रदेश जिंकल्यानंतर येथील कोंक जमातीचे लोक समुद्र किनारपट्टी लगतच्या प्रदेशात पसरले, त्याच्यामुळेच या प्रदेशाला कोंक-कोंकवन-कोंकण-कोकण हे नाव मिळाले. पुढे कोंक (कोकणा) जमातीचे लोक दक्षिण कोकणातून (गोवा, कारवार, रत्नागिरी) उत्तर कोकणात (ठाणे, पालघर) पुढे इतरत्र स्थायिक झाले. कोकणा हे मूळचे रत्नागिरीकडील होते. तिथून त्यांना जव्हार संस्थानातील गंभीरगडाच्या संरक्षणासाठी आणण्यात आले, असे सांगतात. त्यानंतर इ. स. १३९६ ते १४०८ च्या सुमारास पडलेल्या दुर्गादेवीच्या प्रसिद्ध दुष्काळाच्या वेळी ते दक्षिण गुजरात (लाट) व धुळे, नंदूरबारकडे गेले, असा संदर्भ ब्रिटिश जिल्हा गॅझिटिअर्स व मराठी विश्वकोश आदि ग्रंथांमध्ये दिसून येतो. कोकणा जमातीची सुमारे १५० च्या आसपास कुळे वा आडनावे आहेत. यातही बरचसे साम्य आढळून येते, असे लेखकाचे अध्ययन आहे. देशाच्या अनुसूचित जमाती सूचीनुसार महाराष्ट्रात २५ व्या स्थानी, गुजरातमध्ये १४ व्या, दादरा व नगरहवेलीत ४ थ्या, राजस्थानमध्ये २१, कर्नाटकमध्ये ७ क्रमांकावर कोकणा, कोकणी, कुकणा जमात विनिर्दिष्ट आहे. गुजरातमधील ते स्वत:ला कुकणा आणि कुणबी असेही म्हणतात. विशेष म्हणजे डांग जिल्ह्यासाठी (गुजरात राज्य) कोकणा जमातीस कुणबी हा शब्द राज्याच्या अनुसूचित जमाती यादीत सूचीबद्ध आहे. खरेतर ते एकच असून रोटी-बेटी व्यवहार अधिमान्य आहे. २०११ च्या जनगणनेनुसार साधारणपणे तीन राज्य मिळून या जमातीची लोकसंख्या ११ लाखांपर्यंत आहे.



:: पुस्तक परीक्षण ::
डॉ. प्रकाश खेत्री,
छत्रपती संभाजीनगर

कोकणा जमात ही मुख्यत्वे शेती करणारी असल्यामुळे पृथ्वीचे वा धरतरीचे प्रतीक असणारी गौराई म्हणजे अंकुरित होणार्या पालवीवरून यावर्षीचे शेतीचे पूर्वकथन करण्याची परंपरा प्रतिवर्षी आखातीला (अक्षयतृतीया) होते. तेंव्हा कोकणा जमातीची धरतरी (धरती) आणि कणसरी (धान्य) या नैसर्गिक संसाधनाप्रति ऋण व्यक्त करणारी श्रद्धा जी वास्तववादी तद्वतच जीवनाचे शाश्वत मूल्य सांगणारी आहे. म्हणून पुस्तकाचे मुखपृष्ठ हे कोकणा जमातीतील गौराईची उगवण ही मूळ निसर्गधर्माशी नातं सांगते. सूर्य, चंद्र, वीज, तारे, ढग, जल, वृक्ष, वाघ, नाग व पशुपक्षी अशा निसर्गाधीन सजीव-निर्जिव सृष्टीचे कोकणा आदिवासी आराधना करतात. त्यांच्यात मुंजा, खंडेराय, भैरव, भवानी, मारुती, हिरवा, इहमाई, वाघदेव, डोंगरदेव, धरतरी, गावतरी (पाळीव पशू), कणसरी (मुख्य तीन सृजन स्त्री-देवता), मावल्या, मृत पूर्वजांच्या नावाने टाक, साती-आसरा, मरीआई आदि तसेच निसर्ग देवदेवता आहेत. तसेच ते आजही आपल्या कथा-गीतांमधून निसर्गाची आराधना करतात. प्रत्येक कृती आणि त्यांच्या संस्कृतीतून त्यांची निसर्गाशी असणारी नाळ आपणास जाणवते.

या पुस्तकात कोकणा, कोकणी, कुकणा जमातीची ओळख, उत्पत्ती, स्थलांतर, वसतीस्थाने, त्यांचा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहास, कुटुंब, कूळ, नातेसंबंध, राहणीमान, पोशाख, खानपान, दागिने, भौतिक वस्तू, सवयी, जीवनचक्र (जन्म, विवाह व मृत्यू), धर्म, सामाजिक नियंत्रण, प्रतिष्ठा, नेतृत्व, भाषा व शिक्षण, आर्थिक जीवन, सामाजिक सुधारणा व कल्याण यांचा सामाजिक व ऐतिहासिक वेध घेतला आहे. घाटावरचे लोक आजच्या कोकण विभागाला प्राचीन काळात 'कोंगवन' म्हणत. जसे कोळ्यांचे 'कोळवन', गोंडाचे ते 'गोंडवन' तसेच हे कोंगचे 'कोंगवन' होय. पुढे अपभ्रंश होऊन कोंगण, कोंकण झाले. 'कोंग' वा 'कोंक' नावाचे आदिवासी लोक या प्रांतात प्रथम वसले असावेत, त्यावरून या देशास कोंगवन (कोकण) हे नाव मिळाले असावे. काणकोण या नावाचा एक तालुका गोव्याच्या दक्षिणेस आहे. तेव्हा 'कोंक' जमातीवरून 'कोकण' हे नाव या प्रदेशाला मिळाले असावे, या मताचे लेखक समर्थन करतात.

ठाणे, नाशिक, खानदेश, सूरत एजन्सी तसेच बडोदा आदि ब्रिटिश जिल्हा गॅझिटिअर्समध्ये या लोकांना दक्षिण कोकणातून जव्हार संस्थानातील (तेव्हाचे ठाणे, हल्ली पालघर जिल्हा) गंभीरगड किल्ल्याच्या संरक्षणासाठी आणण्यात आले असे म्हटलेले आहे, त्याची खातरजमा करून त्या पुष्ट्यर्थ कोकणा जमातीची कणसरी कथा, इहमाई कथा, मांदळ गीते व लग्नसमारंभ प्रसंगी म्हटली जाणारी गाणी आणि आखातीच्या गौराईतील गाण्यांमध्ये गंभीरगडाचा गौरवपूर्ण उल्लेख येतो या त्यांच्या मौखिक कथा, त्यांची गाणी, विविध क्षेत्र व गड-किल्ल्यांच्या माहितीतून त्यांचे स्थलांतर गोवा, कारवार व रत्नागिरी सीमा भागातून झाल्याच्या सिद्धतेस लेखक पुरावे देत असल्याचे आढळते.

जन्मविधी (पाचवीची पूजा), सतीपूजा, जाऊळ काढणे, विवाह पद्धती, विधी व संस्कार, देवक प्रथा, लहान पेन (साखरपुडा), मोठी पेन किंवा बोळव्या अर्थात नवरीची बोळवण, पुनर्विवाह गांधर्व- मोहतूर, दत्तकप्रथा, काडीमोड, दैनंदिन वर्तणूक, समजुती, रिती, प्रथा, निसर्ग अभ्यास, शकून आणि अपशकून, मृत्यूविधी व संस्कार या संस्कारात भगताचे महत्त्व, कवळीच्या भाजीचा सण (सफेद मुसळी), तेरा (अळू-आर्वी प्रकारातील भाजी) सण (नवांकुर पालवीचा भाज्या म्हणून खाण्यापूर्वी निसर्गाप्रती ऋण व्यक्त करणे), नागपंचमी, पोळा, वाघबारस, दिवाळी, पित्रे, शिमगा-होळी, आखाती आदी प्रमुख सणांविषयी सविस्तर माहिती दिली असून त्यात त्यांच्या जीवनातील निसर्गाधीन प्रासंगिकता विशद केली आहे. आदिवासी वाद्य व निसर्गाधीन साधने यामध्ये मांदळ नृत्य, डेरावादन, ढाका वाद्य, ढोल वाद्य, तूर चर्म वाद्य, पावरी सूर वाद्य, घांगळी एक तंतुवाद्य, संभळ वा शहनाई आदि वाद्यांचे त्यांच्या जीवनातील महत्व सांगितले आहे. सन १९१८ मध्ये मानमोडीची (इन्फ्लूएंझाची साथ) प्राणघातकी साथ निर्माण झाली ती देवाच्या कोपाने झाली या समजुतीने त्या देवाला प्रसन्न करण्यास देशावरील (पठारी भागातून) बोहाडा ऊर्फ भवाड्याची रीत आदिवासींनी उचलली, अर्थात बोहाडा वा भवाडा हिंदूकरणाचे एक रुप असल्याचा लेखकाचा दावा आहे. या जमातीची बहुतांश वसतीस्थाने 'पाडा' या उपसर्गाने निर्देशित असतात तेव्हा पाडा शब्दाची उत्पत्ती ८ व्या शतकांपासून शिलाहार वंशीय राजांनी द्रविडीयन भाषिक शब्दातून मुंबई बेटांच्या क्षेत्रापासून आल्याचे लेखक सांगतात (जसे नागपाडा, नौपाडा, सानपाडा व आग्रीपाडा). ही माहिती देतांना तटस्थता आणि वस्तुनिष्ठता या संशोधन तत्वाचे पालन लेखकांनी केले आहे.

सृष्टीतील वनस्पती उत्पत्ती चक्र आणि मानवी जीव चक्र यामध्ये साम्य आहे असे आदिवासींचे जीवन तत्वज्ञान सांगते. आदिवासीतील कोकणा, वारली, भिल्ल, कोळी महादेव, धोडिया, ठाकर, चौधरा, वसावा आणि कातकरी व इतर जमातींमध्ये कणसरी मुख्य देवतांपैकी एक आहे. कणसरी धान्य देवता असून ही देवता पाच बोंडे असलेल्या नागली वा नाचणी धान्य नावाने ओळखली जाते. देवता ही अजूनही धान्याच्या रुपात पुजली जाताना आपल्याला दिसते. निसर्ग देवतेची पूजा (जल अर्थात पाणदेव, जंगल अर्थात डोंगरदेव, आणि जमीन अर्थात धरतरी-धरतीतून कणसरी वा धान्य पिकते म्हणून जल, जंगल, जमीन यांस देवता मानतात) ही सृजनाशी (नवनिर्मिती) आणि स्त्री सुफलनाशी (प्रजोपत्ती) जोडली गेली आहे हे लेखकाने सचित्र स्पष्ट केले आहे.

(वारली व कोकणा जमातीतील वनस्पती व जीव उत्पत्तीचा विचार)

स्त्री-पुरुष मिलनातून जीव उत्पन्न होतो हाच निसर्गनियम (पर्रीीरश्र श्रु) सृष्टीच्या नव-सृजन उत्पत्तीसाठीही वापरला आहे. याच अर्थाने एक प्रकारे धरती (धरतरी) व कणसरी या स्त्री-देवतांची पूजा (डोंगरदेवता) केली जाते. धरतीच सृष्टी, वनस्पती व प्राणिमात्रांना जन्म देते, त्यांचे पालनपोषण करणारी देवता अशा धरतीवर आकाशातून पडणारा पाऊस (पाणी) म्हणजेच या विश्वावर अदृश्य स्वरुपात फलधारणा करणारा पुरुषरूपी निसर्ग देवतेचे वीर्यबीज आहे. या बीजातून धरतीदेवतेच्या संयोगाने अन्नदेवता म्हणजेच धान्यची (कणसरी) उत्पत्ती होते वा जन्म होतो.

वारली आणि कोकणा जमातींनी निसर्ग सानिध्यात राहून निसर्गनियमाप्रमाणे वनस्पतींना 'फुलधारणा' आल्याशिवाय 'फलधारणा' होत नाही हे अनादि काळापासून वास्तव अनुभवले आहे. हाच निसर्गनियम मानवी उत्पत्तीसही लागू असून मुलीला मासिकधर्म आल्याशिवाय अपत्यप्राप्ती संभवत नाही. म्हणून जमातीत प्रथम मासिकधर्मास 'फुलधान' या नैसर्गिक शब्दाने गर्भधारणेची (फलधारणा) प्रथमावस्था वर्णित आहे. म्हणून त्यांच्यात मासिकधर्माप्रति अशुद्धता वा मलिनताबाबत कोणताही विचार नाही. पाऊस पडल्यासच धान्य उगवते त्यामुळे पाणदेव (पाणी) प्रथम आणि बीजरूपी कणसरी म्हणजे धान्यदेवता (बीज) नंतर येते. पाणी (रींशी) आणि धरती (ळश्र) मिलनातून नवीन अंकुर जन्म घेत असल्याची कथा वारली जमातीमध्ये कांबडनृत्यातून अनुभवास येते. या आणि अशा अनेक पुराव्यातून आदिवासी हे निसर्गपूजक असल्याचे लेखक सिद्ध करतात.

कोकणा तसेच तत्सम आदिवासी जंगलातील विविध ३६ प्रकारच्या वनस्पती रानभाज्या व रानफळे त्या-त्या हंगामात आहारात वापरतात. यातमध्ये पाने, फुले, फळे, मूळे व कंद होय. या वनस्पतीमध्ये भुईआवळी, भारंगी, टाकळा, अळींब, करटूले, तांदुळजा, सराटा, पाथरी, देहडा, हादगा, फांदवेल, म्हैसवेल, मायाळू, चिंचोला, लवाळा, कुई, चंदनबटवा, घोळ वा चिवळी, काटेरीमाठ, शेवळकंद, धामडा, करडई, असंद, करवंद, वाघाटी, कुई, तेरा, कुलू (लोशश्रळपरलशरश), कोवळे बांबू (वासदे), गळघूगर, सीवन, सापूड, अळीव, मोखा, बेंदरकंद, कवळी, गोमट, करमाड, डिना, लोत, तरोटा, तेरअळू, मोखा, वाघाटे, इंद्रजव (लव असणारी कोडई), रताळ्याचे कोंब, मिरचीचे कोंब, कडूकंद, व वाजकंद इ. येतात. पावसाळ्यात जंगलात आढळणार्या शेवळे, कवळी (सफेद मुसळी), आंबाडी, माठ, लोत, कुरडू, दोदडे, वास्ते (बांबूच्या कोवळ्या अंकूराची भाजी), दिहगडी व डिनाची भाजी खातात. या पालेभाज्या, रानफळांबरोबर काही कंदही अन्नांमध्ये येतात. त्यात कडूकंद व वाजकंद प्रामुख्याने येतात. लेखकाने या मधील औषधी गुणधर्म सांगितले आहेत. जमातीची 'कोकणी बोली' ही इंडो-युरोपियन समुहातली इंडो-आर्यन भाषा आहे. कोंकणीत काही शब्द संस्कृतमधून थेट आलेले आजही ते वापरात आहेत, परंतु ते शब्द मराठीत फार प्रचलित नाहीत. ज्ञानेश्वरीतील अनेक शब्द कोकणा जमातीतील लोक बोलताना दिसतात, लेखकाने अशा अनेक महत्त्वाच्या बाबी प्रस्तुत पुस्तकात निर्दशनास आणून दिलेल्या आहेत. कोकणा जमातीचा इतिहास, संस्कृती, परंपरा, आणि सध्याची स्थिती यांचा आढावा लेखकांनी संशोधनात्मक पातळीवर सखोलपणे घेतला आहे. लेखकाची भाषा सामान्य वाचकाला समजेल अशी साधी, सोपी, स्पष्ट आणि प्रभावी आहे.

डॉ. पद्माकर सहारे यांचे कोकणातील कोकणा आदिवासी: ऐतिहासिक आणि सामाजिक वेध हे पुस्तक संशोधनात्मक, वस्तुनिष्ठ, मार्गदर्शक व दिशादर्शक आहे. तेव्हा ते प्रत्येक कोकणा, कोकणी जमातीतील व्यक्ती, कुटुंब, अभ्यासक आणि संशोधक यांनी आपल्या घरात संग्रही ठेवायला हवे, असे मला वाटते.

पुस्तकाचे नाव :-कोकणातील कोकणा आदिवासी: ऐतिहासिक आणि सामाजिक वेध
लेखक :- पद्माकर कमल नागजी सहारे
प्रकाशन :- सौरव प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर
पृष्ठ :- ३७८
किंमत :- ४००/-

# दहीहंडी फोडण्याची स्पर्धा कोठे होते?

**बाल कृष्ण हा फार प्रिय होता. असे मानले जाते की, बाल कृष्ण व त्यांचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर गोपाळकाला तयार करून सर्व वाटून खात असत. गोमंतकातील काल्याला गवळण कालासुद्धा म्हटले जाते. हे एक मिश्रण पौष्टीक आहार असते, म्हणूनही गोकुळाष्टमीचे महत्व अधिक आहे. कोकणात व महाराष्ट्रात उत्सवानिमित्त दहिकाला होतो. या ठिकाणीही हंड्या फोडून तर काही ठिकाणी गोपाळकाला होतो. गोकुळाष्टमीचे एक व्रतही सांगितले असून ते केल्याने संतती, संपत्ती व वैकुंठ लोक यांची प्राप्ती होते, असे वयोवृद्ध सांगतात. याविषयीची अधिक माहिती कृगोनि- श्री कृ. गो. निकोडे गुरूजींच्या शब्दांत वाचा... संपादक.**





श्री कृष्णकुमार आनंदी-
गोविंदा निकोडे गुरूजी.
मु.पो.ता.जि.गडचिरोली
दूरभाष- ७७७५०४१०८६.

हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार सृष्टी पालनकर्ता श्रीहरी विष्णूचे अठरावे अवतार प्रभू श्रीकृष्ण आहे. म्हणून त्याच्या जन्मदिवशी गोकुळाष्टमी साजरी केली जाते. त्याच्याबद्दल सांगायचे झाले तर त्यांनी आपल्या भुतलावर म्हणजे पृथ्वीवर एक साधारण माणसाचा जन्म घेतला होता. त्याचा जन्म हा मानवधर्माचे रक्षण करण्यासाठी झाला होता. त्यामुळे संपूर्ण भारतभर हजारो वर्षांपासून हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गोकुळाष्टमी भारतामध्ये वेगवेगळ्या भागांत वेगवेगळ्या पद्धतीने भ.श्रीकृष्ण मूर्तीचे पूजन करून केले जाते. त्यास कान्होबा बसविणे किंवा मांडणे म्हटले जाते. काही ठिकाणी भक्ती संगीत गायले जाते. तर काही ठिकाणी कृष्णमूर्तीला दही दुधाचा अभिषेक घातला जातो. श्रीकृष्ण जयंती व जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमी हा सण भारतामध्ये खुप आनंदाने साजरा केला जातो. या दिवशी भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला होता. त्यामुळे संपूर्ण भारतामध्ये त्यांच्या जन्मदिवशी कान्होबा बसविणे वा दहीहंडीसारखे कार्यक्रम साजरे केले जातात. या दिवशी भगवान श्रीकृष्णाला वेगवेगळ्या नावांनी बोलावले जाते. जसे की गोविंद, बाल गोपाल, कान्हा, कान्होबा, गोपाल, केशव ही सर्व श्रीकृष्णांची प्रसिद्ध नावे आहेत. गोकुळाष्टमी ही भगवान श्रीकृष्णाच्या जन्मापासून हिंदू पंचांगानुसार भाद्रपद महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या आठव्या दिवशी प्रत्येक वर्षी साजरी केली जात असल्याचे सांगितले जाते.भ.श्रीकृष्णाचा जन्म श्रावण महिन्यात वद्य अष्टमीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदीशाळेत झाला. म्हणून त्या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. अष्टमीच्या दिवशी काही लोक व्रतसुद्धा करतात. या दिवशी एकभक्त राहून पांढर्या तिळाचा कलप अंगाला लावून स्नान करतात. व्रताचा संकल्प करून देवघर फुले व पाकळ्यांनी सुशोभित करतात. त्यास्थानी देवकीचे सुतीकागृह स्थापन करतात. मंचकावर देवकी आणि श्रीकृष्ण यांच्या मूर्तीची स्थापना करतात. बाजूला यशोदा व तिची नवजात कन्या, वसुदेव व नंद यांच्याही मूर्ती बसवतात. त्या वेळी मथुरेमधील राजा अत्याचारी कंस याला प्रजा कंटाळली होती. तो प्रजेला असह्य यातना आणि त्यांच्यावर फार जुलूम करत होता. त्यामुळे तेथील प्रजा खूपच दु:खी व कष्टी होती. लोकांना त्या अत्याचारी राजापासून मुक्ती देण्यासाठी भ.श्रीकृष्णाने पृथ्वीवर जन्म घेतला. गोकुळाष्टमी या निमित्त होणारी हालचाल संपूर्ण भारतामध्ये दिसून येते. त्याचबरोबर परदेशी राहणाऱ्या भारतीय लोकांतसुद्धा गोकुळाष्टमी खुप धुमधडाक्यात साजरी केली जाते. भ.श्रीकृष्णाने पृथ्वीवर देवकी आणि वासुदेव यांच्या पोटी जन्म घेतला. भ.श्रीकृष्णाच्या जन्माच्या वेळेस आकाशवाणी झाली होती, की देवकीचा आठवा पुत्र कंसाचा वध करेल. कंसाच्या अत्याचारांनी संपूर्ण मथुरा नगरी त्रस्त झालेली होती. त्याच्या राज्यात राज्यांमध्ये निर्दोष लोकांना सुद्धा शिक्षा केली जाई. आपल्या मृत्यूच्या भीतीने त्याने एवढेच नव्हे तर आपली बहिण देवकी आणि तिचा पती वासुदेव ह्यांना सुद्धा काळ कोठळीमध्ये टाकले होते. एवढेच नव्हे तर कंसाने आपल्या अत्याचाराने देवकीचे सहा पुत्रही आधीच मारून टाकले होते.

भ.श्रीकृष्णांच्या जन्मदिवशी आकाशामधून घनघोर पावसाचा वर्षाव होण्यास सुरुवात झाली. बाल कृष्णाला सुरक्षित स्थानावर घेऊन जाण्यासाठी वसुदेव यांनी त्याला एका टोपलीत घेतले. यमुना नदी पार करत त्यांनी त्याला आपला मित्र नंद गोपालकडे नेले आणि त्यांनी आपल्या पुत्राला- बाल कृष्णाला यशोदा मातेपाशी झोपून ठेवून त्यांची कन्या घेऊन परत आले. अशा प्रकारे देवकीपुत्र भ.श्रीकृष्णाचे पालन-पोषण यशोदा मातेने केले. अशाप्रकारे भ.श्रीकृष्णाच्या दोन माता होत्या, एक जन्मदात्री आणि दुसरी पालनकर्ती. एक म्हणजे देवकीमाता आणि दुसरी म्हणजे यशोदामाता होय.

बाल कृष्ण हा फार प्रिय होता. असे मानले जाते की, बाल कृष्ण व त्यांचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर गोपाळकाला तयार करून सर्व वाटून खात असत. गोमंतकातील काल्याला गवळण कालासुद्धा म्हटले जाते. हे एक मिश्रण पौष्टीक आहार असते, म्हणूनही गोकुळाष्टमीचे महत्व अधिक आहे. कोकणात व महाराष्ट्रात उत्सवानिमित्त दहिकाला होतो. या ठिकाणीही हंड्या फोडून तर काही ठिकाणी गोपाळकाला होतो. गोकुळाष्टमीचे एक व्रतही सांगितले असून ते केल्याने संतती, संपत्ती व वैकुंठ लोक यांची प्राप्ती होते, असे वयोवृद्ध सांगतात. सप्तमीच्या मध्यरात्री सुचिर्भूत होऊन संकल्प करतात व सहपरिवार भ.श्रीकृष्णाची पूजा करतात. अष्टमीच्या दिवशी देवालाही फराळ, नैवेद्य दाखवतात. गोपाल म्हणजे गायीगुरे व कायद्याचे पालन करणाऱ्या या भ.श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने दुसऱ्या दिवशी- गोपाळकाल्याच्या दिवशी काल्याचा प्रसाद केला जातो. यामध्ये काला म्हणजे एकत्र मिळवणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, लिंबू व आंब्याचे लोणचे, दही, भिजवलेली डाळ, साखर, फळांच्या फोडी आदी घालून एक खाद्यपदार्थ तयार होतो, त्यास गोपालकाला असे म्हणतात.श्रीकृष्णभक्त गोकुळाष्टमीच्या उत्सवावर उपवास ठेवत असतात, मंदिरांना सजवले जाते तसेच गोपाळमूर्तीला पाळण्यात ठेवून झोका दिला जातो. भजन-कीर्तन केले जाते आणि त्यासोबतच तरुणांमध्ये दहीहंडी फोडण्याची स्पर्धा घेतली जाते. श्रीकृष्णनगरी मथुरामध्ये सुद्धा दुरून दुरून भक्तमंळी दर्शनासाठी येत असतात. त्या दिवशी संपूर्ण मथुरानगरी भ.श्रीकृष्णाच्या नामोच्चाराने दुमदुमून जाते. श्रीकृष्णाच्या लहानपणी लोणी, दही, दूध आपल्या मित्रांसोबत एकत्र येऊन चोरून खाण्याचा प्रयत्न करीत असत. दही हे त्यांचे आवडते खाद्य होते. म्हणून दहीहंडी महोत्सव त्यांच्या आठवणी निमित्त साजरा केला जातो. उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपाळकाला असे म्हणतात. कृष्णजयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. महाराष्ट्रात विशेषत कोकणात या सणानिमित्त दुसऱ्या दिवशी दहीकाला केला जातो. त्याचे जेवण करून उपवास सोडला जातो. गोविंदा आला रे गोविंदा आला, गोकुळात आनंद झाला. असे गाणे म्हणत लहान-मोठे पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात.

कित्येक ठिकाणी गोपाळकाला करून श्रीकृष्ण चरित्रातील सोंगे करण्याचीही प्रथा आहे. या दिवशी महाराष्ट्रात मुंबई येथे उच्च मडक्यात दही, दूध यांनी भरलेला हंडा ठेवून तिथपर्यंत मानवी मनोरेची स्थापना करून दहीहंडा फोडण्याचा साहसी खेळ होतो. महाराष्ट्रातील एक वैष्णव वृत्त आहे. श्रीकृष्ण त्याच्या मित्रांसोबत गाई चारण्यासाठी जात असत व आपले सवंगडी या सर्वांच्या शिदोर्या एकत्र करून त्या खाद्यपदार्थाचा काला केला व सर्वात सत्याचे रक्षण केले, अशी एक कथा आहे. म्हणून या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा आहे. अशाप्रकारे गोकुळाष्टमी भारतातील विविध राज्यात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरी केली जाते.

!! श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या समस्त भाविकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# आदिवासी पाड्यांचे आदर्श गावांमध्ये रूपांतर करावे – राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

**मुंबई । प्रतिनिधी**

आदिवासी समाजाच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आदिवासी पाड्यांचे आदर्श गावांमध्ये रुपांतर करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली आज राजभवन येथे झालेल्या बैठकीत आदिवासी जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर आदर्श आदिवासी गाव बनविणे आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणे यावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार यादव, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, आदिवासी विकास आयुक्त नैना गुंडे, आदिवासी विकास वित्त महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड, आदिवासी संशोधन, प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी प्रवीण दराडे, पद्मश्री पोपटराव पवार, विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले, आदर्श आदिवासी गाव या कल्पनेच्या अंमलबजावणीने राज्याच्या विकासात मोठा बदल घडवता येईल.



या गावांमध्ये रस्ते, शुद्ध पिण्याचे पाणी, पायाभूत सुविधा, वैद्यकीय सेवा, दर्जेदार शिक्षण, शाश्वत कृषी विकास, व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन द्यावे लागेल. आदिवासी बांधवांच्या सामाजिक व सांस्कृतिक उत्थानासाठी आणि आर्थिक विकासासाठी प्रयत्न करण्यावर भर द्यावा लागेल.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उत्तम शाळा सुरू करून 'के जी टू पी जी' पर्यंतच्या दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. प्रस्तावित आदिवासी विद्यापीठांमध्ये अधिकाधिक राखीव जागा देऊन आदिवासी विद्यार्थ्यांची स्वप्ने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. यासाठी विविध विभागांचे सचिव आणि सामाजिक संस्थांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे, असे राज्यपालांनी स्पष्ट केले.या बैठकीत 'प्रधानमंत्री जनमन योजने'च्या राज्यातील अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. आदिवासी बांधवांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळवता यावा यासाठी ओळख दर्शविणारे कागदपत्रे वितरित करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना राज्यपालांनी दिल्या.

# भजन स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

**नागपूर । प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र कल्याणेश्वर मंदिर, महाल येथे श्रावण मासानिमित्त आयोजित भव्य भजन स्पर्धेचे उद्घाटन २४ व २५ ऑगस्ट रोजी करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन प्रसिद्ध व्यक्तिमत्व मधुरा गडकरी यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून विश्वमांगल्य सभेच्या शिक्षण, धर्म, संस्कृती संयोजिका डॉ. राधा कमाविसदार आणि आमदार प्रवीण दटके यांची उपस्थिती होती. भजन हे ईश्वरप्राप्तीचे आणि सांस्कृतिक परंपरा व वारसा जोपासण्याचे सर्वोत्तम माध्यम असल्याचे विचार डॉ. राधा कमाविसदार यांनी व्यक्त केले. यावेळी, मधुरा गडकरी यांनी सर्व मातृशक्तीला भजन स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत एकूण १८१ भजनी मंडळांनी सहभाग घेतला आहे. त्यातील ११ उत्तम भजनी




मंडळांची महाअंतिम फेरीसाठी निवड करण्यात येईल. महाअंतिम फेरी १ सप्टेंबर रोजी होणार असून बक्षीस वितरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होईल. विजेत्या ११ भजनी मंडळांना भव्य रोख पुरस्कार, गौरवचिन्ह व गौरव पत्र प्रदान केले जाईल.

स्पर्धेचे संयोजन डॉ. श्रीरंग वराडपांडे यांचे असून, आयोजन समितीमध्ये बानाबाकोडे, गुणवंत पाटील, पिंजरकर, काटोले, रेखा निमजे, श्वेता निकम भोसले, विलास सपकाळ आणि इतर पदाधिकारी यांचे सक्रिय योगदान लाभले आहे.

# घुग्घुस शहरात डेंग्यू प्रतिबंधक औषधीची फवारणी करा–विवेक बोढे

**घुग्घुस । प्रतिनिधी**

घुग्घुस शहरात डेंग्यू प्रतिबंधक औषधीची फवारणी करा अशी मागणी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी निवेदनातून केली आहे.

सध्या घुग्घुस शहरात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. बहिरमबाबा नगर येथील एका तरुणीचा रविवारला डेंग्यूने मृत्यू झाला तसेच दिवसेंदिवस डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढतच आहे रुग्णालयात रुग्णांची मोठी गर्दी होत आहे.

डासांमुळे उद्भवणाऱ्या डेंग्यू रोगाची लागण शहरवासियांना मोठया प्रमाणात होत आहे. त्या अनुषंगाने शहरात डेंग्यू रोग प्रतिबंधक औषधाची फवारणी करणे अत्यंत आवश्यक आहे.ही समस्या लक्षात घेत भाजपा जिल्हा



महामंत्री विवेक बोढे यांनी शिष्टमंडळासह नगर परिषदेचे मुख्याधिकारी निलेश रांजनकर यांची भेट घेतली व चर्चा करून निवेदन दिले.

यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, माजी सरपंच संतोष नुने, संजय तिवारी, साजन गोहणे, चिन्नाजी नलभोगा, अमोल थेरे, शिवसेना शहरप्रमुख महेश डोंगे, हसन शेख, बबलू सातपुते, इर्शाद कुरेशी, प्रवीण सोदारी, शाम आगदारी,सुशील डांगे,अमोल नागपुरे, दिपक कामतवार व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सेवा फाउंडेशनतर्फे प्रज्ञावंतांचा गौरव सोहळा संपन्न




**पुलगाव । प्रतिनिधी**

सेवा फाउंडेशन पुलगावच्या वतीने देवळी तालुक्यातील गुणवंत आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. हा सोहळा मातृसेवा सभागृहात पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय गाते उपस्थित होते. त्यांनी गुणवंत विद्यार्थी आणि मान्यवरांचा सत्कार करून त्यांना भावी यशासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका संघचालक अरविंद हलमारे होते. या सोहळ्यात आर.के. हायस्कूलचे समन्वयक नूरसिंग जाधव, कलाविष्कार मंडळाचे अध्यक्ष दिलीप घालणी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. नितीन चव्हाण, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रफुल पाझारे, सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष मंगेश झाडे आणि इतर मान्यवर मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमात देवीदास डाहे, गणेशराव इंगळे, अविनाश भोपे, मृणाल सोनी, महादेवराव कणसे, रमेशराव निंबाळकर, प्रदीप पराते, विठ्ठलराव वानखेडे आणि इतर मान्यवर तसेच गुणवंत विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शकील खान, दीपक आहुजा, प्रशांत इंगोले आणि इतरांनी परिश्रम घेतले.

# बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांने मेथवडे गावात एस.टी सेवा सुरु

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुक्यातील मेथवडे या गावी डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांने एस.टी.बस सुरु.मेथवडे,मांजरी,पिरजादे वस्ती,माळी वस्ती येथील नागरीकांना ,विद्यार्थ्यांना सांगोला येथे जाण्या-येण्या साठी कुठलीही एस.टी.बस सेवा नसल्याने शालेय विद्यार्थी ,वयोवृध्द नागरीक व महिला यांची अतिशय गैरसोय होत असल्याने मेथवडे गावातील नागरीक एस.टी सेवा सुरु करावी म्हणुन अनेक दिवस मागणी करीत होते. मेथवडे ग्रामस्थांनी संबंधीत सांगोला आगार प्रमुखांना एस टी सेवा सुरु करण्याबाबत डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन सुध्दा दिले होते. पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांनीही आगार प्रमुखांना नागीकांच्या विद्यार्थ्यांच्या अडचणी वेळोवेळी लक्षात आणुन दिल्या होत्या.बाबासाहेब देशमुख व ग्रामस्थांच्या सततच्या पाठपुराव्याला यश येऊन समंधीत आगार प्रमुखांनी मेथवडे गावला एस टी सुरु करण्याचा निर्णय घेतला आसुन ..



सोमवार दिनांक २६/८/२०२४ रोजी सकाळी ६-३० वाजता नवीन सुरु करण्यात आलेल्या एस टी चे बसचे पुजन व एस.टी बसच्या चालक व वाहक यांचा सत्कार पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांच्या शुभ हस्ते करण्यात आले असुन एस.टी बस सेवा नागरीकांसाठी सज्ज झाली आहे.

सांगोला मेथवडे एस.टी.सकाळी ६-०० वाजता सांगोल्यातुन निघणार असुन ती एस.टी बस सकाळी ६ -३० वाजता मेथवड्यात पोहचेल व लगेचच सांगोल्याला जाण्यासाठी माघारी फिरेल नंतर सांगोल्यातुन दुपारी १२-३० वाजता पुंन्हा निघून १-०० वाजता मेथवडे येथे पोहचणार व लगेचच पुंन्हा सांगोल्याला परत जाणार आहे आशा प्रकारचे नव्याने सुरु करण्यात आलेल्या एस.टी.बसचे वेळापत्रक आहे यांची नोंद नागरीकांनी , विद्यार्थ्यांनी घ्यायची आहे.

सदर एस.टी सेवा सुरु झाल्याने मेथवडे ,मांजरी,पिरजादे वस्ती,माळी वस्ती येथील नागरीकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण दिसुन येत आसुन बाबासाहेब देशमुख यांच्या कामाचे कौतुक सुध्दा होताना दिसत आहे.सदर एस.टी.सेवेचा शुभारंभ करताना भाई गिरीष गंगथडे,परमेश्वर पवार,रमेश पवार,कल्याण कोळी,नवनाथ पवार,आण्णासाहेब पवार,विलास माळी,श्रीमंत लेंडवे,आण्णा पवार,अनिल मेजर ,सीताराम शेळके,अमोल पवार,मा.हराळे साहेब,सौ.आशा कल्याण जाधव,सौ.संगीता परमेश्वर पवार,सौ.राणी रमेश पवार यांच्या सहित अनेक नागरीक उपस्थीत असल्याची माहिती प्रसिध्दी प्रमुख भाई चंद्रकांत सरतापे यांनी दिली

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**तहसील कार्यालय, वरोरा**

क्रमांक/म.शा./प्रस्तुतकार-२/कावि-८३४/२०२४
दिनांक १९/०८/२०२४

**वाचा** -भारत सरकार , विधी व न्याय विभाग यांचे शासन राजपत्र दिनांक ११ ऑगष्ट २०२३ प्रसिद्ध झालेला जन्म मृत्यु नोंदणी कायदा (सुधारित)२०२३

**जाहीरनामा**

ज्याअर्थी, अर्जदार संगिता श्रीकृष्ण मेश्राम रा .वरोरा त .वरोरा जि.चंद्रपूर यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९८३ रोजी मौजा- वरोरा ता.वरोरा जि.चंद्रपूर येथे राहते घरी नगरपरिषद वरोरा / ग्रामपंचायत - , वरोरा यांचे कार्यक्षेत्रात झालेला असून अर्जदाराची जन्म नोंद होण्याबाबत अर्जदार यांनी भारत सरकार , विधी व न्याय विभाग यांचे शासन राजपत्र दिनांक ११ ऑगस्ट २०२३ प्रसिद्ध झालेला जन्म व मृत्यू नोंदणी कायदा (सुधारित ) २०२३ अन्वये दि १२ /०८/ २०२४ रोजीचा अर्ज या कार्यालयात सादर केला आहे .

त्याअर्थी , सर्व जनतेला / हितसंबंधितांना या जाहीरनाम्याद्वारे सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत कुणाला उजर , तक्रार व आक्षेप असल्यास त्यांनी एक महिन्याच्या आता आपला लेखी उजर , तक्रार व आक्षेप दिनांक १९ /०९/२०२४ पर्यंत नोंदवावा. अन्यथा कुणालाही कोणताही विरोध किंवा तक्रार वा उजर नाही असे समजून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारित करण्यात येईल .

**(उल्हास लोखंडे )**
**नायब तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी , वरोरा**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**तहसील कार्यालय, वरोरा**

क्रमांक/म.शा./प्रस्तुतकार-२/कावि-८३/२०२४
दिनांक १९/०८/२०२४

**वाचा** :-भारत सरकार , विधी व न्याय विभाग यांचे शासन राजपत्र दिनांक ११ ऑगष्ट २०२३ प्रसिद्ध झालेला जन्म मृत्यु नोंदणी कायदा (सुधारित)२०२३

**जाहीरनामा**

ज्याअर्थी, अर्जदार कृपावंती गणुजी बेहरे रा. निमसळा पो.दहेगाव त.वरोरा जि.चंद्रपूर यांचा जन्म दिनांक २८/०१/१९७९रोजी मौजा-निमसळा ता.वरोरा जि.चंद्रपूर येथे राहते घरी ग्रामपंचायत समिती , वरोरा यांचे कार्यक्षेत्रात झालेला असून अर्जदाराची जन्म नोंद होण्याबाबत अर्जदार यांनी भारत सरकार , विधी व न्याय विभाग यांचे शासन राजपत्र दिनांक ११ ऑगस्ट २०२३ प्रसिद्ध झालेला जन्म व मृत्यू नोंदणी कायदा (सुधारित ) २०२३ अन्वये दि १२ /०८/ २०२४ रोजीचा अर्ज या कार्यालयात सादर केला आहे .

त्याअर्थी , सर्व जनतेला / हितसंबंधितांना या जाहीरनाम्याद्वारे सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत कुणाला उजर , तक्रार व आक्षेप असल्यास त्यांनी एक महिन्याच्या आता आपला लेखी उजर , तक्रार व आक्षेप दिनांक १९ /०९/२०२४ पर्यंत नोंदवावा. अन्यथा कुणालाही कोणताही विरोध किंवा तक्रार वा उजर नाही असे समजून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारित करण्यात येईल .

**(उल्हास लोखंडे )**
**नायब तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी , वरोरा**

# वसुधा नाईक यांना 'जीवन गौरव प्रजासत्ताक अमृत गौरव पुरस्कार २०२४' प्रदान

**अमरावती । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक अमृत गौरव पुरस्कार समितीने महाराष्ट्र राज्यातील २०२४ साठी वसुधा वैभव नाईक यांना 'जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित केले. शिक्षिका, लेखिका, कवयित्री आणि समाजसेविका म्हणून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कवी बाळासाहेब तोरस्कर यांनी भूषवले. उद्घाटन सोहळा प्रसिद्ध साहित्यिक आणि पत्रकार डॉ. ख.रं. माळवे यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष नागेश हुलवळे यांनी स्वागतपर भाषणात सर्व मान्यवरांचा सत्कार केला आणि आयोजनाच्या प्रयत्नांचे श्रेय दिले.

या कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांमध्ये पद्मश्री डॉ. डी. जी. यादव, डॉ. रेडिक एंजल्स, डॉ. सुकृत खांडेकर, भानुदास केसरे, प्रमोद महाडिक, रामकृष्णन कोळवणकर, राजेश कांबळे आणि डॉ. नॅन्सी अब्लुकर्क यांचा समावेश होता.

कार्यक्रमात नवोदित कवींच्या काव्यसंग्रहाचे



प्रकाशन करण्यात आले. पत्रकार, शिक्षक, कवी आणि लेखक इत्यादी विविध क्षेत्रातील २०० पेक्षा जास्त मान्यवरांना त्यांच्या कार्यासाठी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन नॅशनल लायब्ररी, पी. बी. ई. सोसायटीचे नाईट कॉलेज, वर्ड विजन संस्था आणि लेखक रमेश पाटील, प्रमोद सूर्यवंशी, योगेश हरणे यांच्यासह अनेकांनी केले. या संस्थांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

सह्याद्रीचा राखणदार







# रक्षा बंधन:सक्षम,आत्मनिर्भर आणि स्वाभिमानी बनविण्याचा संकल्प - आ.किशोर जोरगेवार

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने राजीव गांधी सभागृहात आयोजित रक्षा बंधन कार्यक्रमात हजारो बहिणींनी आमदार किशोर जोरगेवार यांना राखी बांधून त्यांचा स्नेह आणि आशीर्वाद प्राप्त केला. रक्षा बंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा, विश्वासाचा आणि समर्पणाचा प्रतीक असताना, आ. किशोर जोरगेवार यांनी आपल्या बहिणींना सक्षम, आत्मनिर्भर आणि स्वाभिमानी बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.

आ. किशोर जोरगेवार यांनी कार्यक्रमात बोलताना सांगितले की, भाऊ म्हणून तुम्हाला रक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे, मात्र आपल्या बहिणींना सक्षम आणि आत्मनिर्भर बनविणे हा देखील आमचा प्रामाणिक संकल्प आहे. यंग चांदा ब्रिगेडच्या महिला आघाडीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे आणि 'अम्मा का टिफिन' उपक्रमात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.



आ. जोरगेवार यांनी पुढे सांगितले की, विकास म्हणजे फक्त रस्ते, नाली, इमारती तयार करणे नाही. खरा विकास म्हणजे आपल्या लाडक्या बहिणींना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनवणे. मागील दोन वर्षांत आम्ही शहरातील प्रत्येक प्रभागात विविध प्रशिक्षण शिबीर आयोजित केली आहेत, ज्यामध्ये ब्युटी पार्लर, हेअर कटिंग, मेकअप, शिवणकाम, फॅशन डिझाईन यासारख्या प्रशिक्षणांचा समावेश आहे. यामुळे शेकडो महिलांनी स्वतःचा रोजगार उभारला आहे.आ. किशोर जोरगेवार यांनी कार्यक्रमाच्या शेवटी सांगितले की, आजच्या युगात आपल्या बहिणींना सक्षम, आत्मनिर्भर आणि स्वाभिमानी बनविणे हे आपले प्रमुख कर्तव्य आहे. समाजाच्या प्रगतीसाठी स्त्रियांना शिक्षण, संधी आणि समर्थन देणे आवश्यक आहे. स्वाभिमान हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आधारस्तंभ आहे आणि स्वाभिमानाने भरलेली स्त्री कोणत्याही परीक्षेत यशस्वी होऊ शकते. कार्यक्रमात यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांसह श्री माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, वंदना हातगावकर, सविता दंढारे, कौसर खान, सायली येरणे, विमल कातकर आदींची उपस्थिती होती. आ. किशोर जोरगेवार यांनी राखी बांधणाऱ्या बहिणींना भेटवस्तू देऊन त्यांच्या मागे उभे राहण्याचे आश्वासन दिले. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला आणि त्यात हजारो महिलांचा सक्रिय सहभाग होता.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेला चंद्रपूर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

### १०,७६६ अर्ज प्राप्त



**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राज्य शासनाने ६५ वर्षे व त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेली 'मुख्यमंत्री वयोश्री' योजना चंद्रपूर जिल्ह्यात अत्यंत लोकप्रिय ठरली आहे. या योजनेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे जिल्ह्यातील १०,७६६ ज्येष्ठ नागरिकांनी अर्ज सादर केले आहेत. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना एकवेळेच्या तीन हजार रुपयांच्या आर्थिक सहाय्याचा लाभ मिळणार आहे, जे त्यांच्या जीवनात महत्वपूर्ण बदल घडवून आणेल.

मुख्यमंत्री वयोश्री योजना वरिष्ठ नागरिकांच्या शारीरिक अडचणींवर मात करण्यासाठी व त्यांना आवश्यक सहाय्यक उपकरणे व साधने उपलब्ध करून देण्यासाठी सुरु करण्यात आली आहे. यामध्ये चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर यांसारख्या उपकरणांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी योगोपचार केंद्रे व मन:स्वास्थ्य केंद्रे उपलब्ध आहेत. या योजनेचे विशेषतः कौतुक करावे लागेल कारण ती वृद्ध नागरिकांच्या जीवनातील अडचणींना मात देण्यासाठी व त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ३१ डिसेंबर २०२३ रोजी वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेले आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष रुपयांच्या आत असलेले नागरिक योजनेचा लाभ घेऊ शकतात. अर्ज सादर करताना आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार कार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराची दोन छायाचित्रे आणि स्वयंघोषणापत्र यांचा समावेश आहे.

या योजनेमुळे वृद्ध नागरिकांचे जीवन सुधारण्यास मोठा हातभार लागेल, असे जिल्हा प्रशासनाचे प्रतिनिधी सांगतात. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय किंवा शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा कार्यालयात संपर्क साधा.

## संदीप ढोमणे यांना विदर्भ रत्न पुरस्काराने सन्मानित

**पुलगाव | प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्वर्णकार संस्थेचे प्रदेश उपाध्यक्ष, ऑल इंडिया जेम्स अँन्ड ज्वेलरी ट्रेड कॉन्सिलचे सभासद, तसेच भगवती अँग्रो इंडस्ट्रीज व वैष्णो ज्वेलर्सचे संचालक संदीप ढोमणे यांना उद्योग, व्यवसाय, धर्म, समाज, आणि शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'विदर्भ रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार फ्युचर अर्थ फाऊंडेशन आणि पोलीस अँन्ड डिफेन्स एम्प्लाईज वेलफेअर असोसिऐशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात आला.



२५ ऑगस्ट २०२४ रोजी अमरावती येथील हॉटेल प्राईम पार्क रिसॉर्ट येथे आयोजित कार्यक्रमात उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खा. अनिल बोन्डे, आ. रवि राणा, माजी खासदार नवनीत राणा, माजी मंत्री प्रविण पोटे, माजी आमदार सुनिल देशमुख यांच्या हस्ते संदीप ढोमणे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संदीप ढोमणे यांच्या या सन्मानाबद्दल पुलगाव शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्था, आणि संघटनांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त २७ ऑगस्ट रोजी चंद्रपुरात

चंद्रपूर-भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार यादीचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती सादर करण्याच्या कालावधीत मतदार यादी निरीक्षक तथा नागपूर विभागाच्या विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी २७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे भेट देणार असल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी यांनी कळविले आहे.

## कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे राज्य सल्लागार पदी प्रा.नीता खोत

**नागपूर | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे राज्य सल्लागार पदी प्रा. नीता खोत यांची निवड महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा. सुनील डिसले बारामती (पुणे ), राज्य सचिव प्रा. बाळासाहेब माने मुंबई यांनी राज्य कार्यकारीणी सभेत जाहीर केली. प्रा. नीता खोत जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघद्वारा माय मराठी सरोसती( नागपूर शहर ) च्या उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी गेल्या पाच वर्षात मराठी विषय शिक्षकांना संघठित करून अध्यापनात येणाऱ्या अडचणींवर तसेच विविध विषयांवर तोडगा काढण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची राज्य सल्लागार पदी निवड करण्यात आली आहे. त्या कोरोना काळापासून तर आजतागायत बारावीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करणे, जिल्हास्तरावर विविध स्पर्धा उपक्रम राबविणे, विविध स्पर्धांचे परिक्षक आणि प्रशिक्षक, मार्गदर्शक म्हणून त्यांची ख्याती आहे. शिक्षक संघटनामध्ये त्या नेहमी सक्रिय असून शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी तत्परतेने धावून जातात. मराठी भाषा विषयाच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी, भाषाविषयक उपक्रमांचे संवर्धन करणे, जिल्हास्तरावर विविध स्पर्धात्मक उपक्रम राबविणे, तसेच कनिष्ठ माध्यमिक स्तरावर मराठी भाषा विषय सक्तीचा व्हावा यासाठी सदैव प्रयत्नशील असणे



अशा विविध उपक्रमांमध्ये त्या नेहमीच सहभागी असतात.त्यांच्या या निवडीबद्दल डॉ सुप्रिया पेंढारी, प्रा.दिपाली सेलोकर, प्राचार्य डॉ राजेश देशपांडे, मुख्याध्यापक मनोज वर्भे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ.शैलेंद्र लेंडे, डॉ.अंकुश तितिरमारे, एकात्मिक बाल विकास अधिकारी कल्पना मालोदे, प्राचार्य प्रशांत शेळके, प्राचार्य डॉ सुदर्शन दिवसे, प्रा.सपन नेहरोत्रा, प्रा.जयंत राऊत, डॉ.हेमंत देशमुख, डॉ.संजय पाखमोडे,डॉ.यशवंत घुमे यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करीत वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# करमाळा येथील सूरताल संगीत विद्यालयाचा सातवा आंतर राष्ट्रीय महोत्सव बहारदार शास्त्रीय नृत्यसादरीकरणाने संपन्न

**करमाळा | प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील सूरताल संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित सातवा आंतरराष्ट्रीय सूरताल महोत्सव विविध गीतांच्या आणि बहारदार शास्त्रीय नृत्य सादरीकरणाने संपन्न झाला. या महोत्सवात कोलकाता, गुवाहाटी, दिल्ली, आगरताळा, मुंबई येथील कलाकारांनी कथक, सत्रीय, भरतनाट्यम, कुचिपुडी, आणि मणिपुरी नृत्य सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली. महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य भारतीय जनता पार्टी महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे, सहारा इन्स्टिट्यूट अकलूजच्या डॉ. श्रद्धा जंवजाळ, कृष्णा हॉस्पिटलच्या डॉ. कविता कांबळे, तपश्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रेणिक शेठ खाटेर, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य



मिलिंद फंड, नगरसेविका संगीता खाटेर, नगरसेवक महादेव फंड, नगरसेवक अतुल फंड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि स्वागत गीताने झाली. सूरताल संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध गीते सादर करून वातावरण अधिक रंगतदार केले. यावेळी विविध कलाकारांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये डॉ. सुस्मिता झा (दिल्ली) यांना शास्त्रीय गायनासाठी सूरताल सरस्वती वॉर्ड, श्रीमती सुमना बायें (कोलकाता-वेस्ट बंगाल) यांना कुचिपुडी नृत्यासाठी सूरताल नृत्य भूषण, डॉ. क्षमा आगरकर-कुलकर्णी (मुंबई-महाराष्ट्र) यांना कथक नृत्यासाठी सूरताल नृत्य शिरोमणी, श्रीमती सुदेशना सिन्हा (आगरतळा-त्रिपुरा) यांना मणिपुरी नृत्यासाठी सूरताल नृत्य कलाभूमी, आणि डॉ. जुगनू कापडिया (सुरत-गुजरात) यांना भरतनाट्यमसाठी सूरताल कलानिधी या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.संस्थेचा मानाचा सूरताल जीवनगौरव पुरस्कार शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल गिरधरदास देवी प्रतिष्ठानच्या संचालिका सुनिता देवी यांना प्रदान करण्यात आला.कार्यक्रमाच्या सांगतेसाठी प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी राग भैरवी सादर केला. यावेळी संतोष पोतदार, दिगंबर पवार, सुहास कांबळे, सतिश वीर गुरुजी, अशोक बरडे गुरुजी, पत्रकार दिनेश मडके, प्राचार्य नागेश माने, बाळासाहेब महाजन, किरणकुमार नरारे, प्रतीक पाटील (पुणे) आदी मान्यवरांसह विद्यार्थी, पालक आणि श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब नरारे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. अनुराधा शेलार व सौ. संध्या शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रेश्मा जाधव यांनी मानले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .